**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 42** **November - December - 2025**

# महाविद्यालयीन तरुणांचा उद्योजकतेकडे बघण्याचा दृष्टिकोन – एक दृष्टिक्षेप *(संदर्भ : नाशिक जिल्हा)*

**श्री. पवन लक्ष्मण गायकवाड[1], डॉ. आशुतोष विठ्ठल मोरे[2]**

[1] *संशोधन विद्यार्थी, सहा.प्राध्यापक, जी .एम .डी. आर्ट्स, बी.डब्लू.कॉमर्स ऍण्ड सायन्स कॉलेज सिन्नर, नाशिक संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित (Affiliated to) एल.व्ही .एच.आर्ट्स, सायन्स ऍण्ड कॉमर्स कॉलेज पंचवटी,नाशिक*

[2] *संशोधन मार्गदर्शक, सहा.प्राध्यापक, एल. व्ही. एच. आर्ट्स, सायन्स ऍण्ड कॉमर्स कॉलेज पंचवटी, नाशिक*

*Corresponding Author – श्री. पवन लक्ष्मण गायकवाड*

**DOI - 10.5281/zenodo.17906148**

**गोषवारा:**

*या लेखात नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुणांचा उद्योजकतेकडे बघण्याचा दृष्टिकोन तपासण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेबद्दल आकर्षण आहे, परंतु जोखीम, भांडवलाचा अभाव व मार्गदर्शनाची कमतरता हे मोठे अडथळे आहेत. स्थानिक संसाधने, शैक्षणिक संस्था व सरकारी योजना यांचा योग्य वापर झाल्यास उद्योजकतेची चळवळ गतीमान होईल.*

*महाविद्यालयीन तरुणांचा उद्योजकतेकडे वळण हे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक घटकांनी प्रभावित असते. नाशिक जिल्ह्यातील अभ्यासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनाचे विश्लेषण केले गेले. पद्धती: गुणात्मक व मात्रात्मक माहिती गोळा करून सममितीय नमुना वापरला गेला; प्रश्नावली व मुलाखती यांचा समावेश होता. बहुतेक विद्यार्थ्यांमध्ये संधी शोधण्याची उत्सुकता आढळते, परंतु भांडवलाचा अभाव, विपणन विषयक माहितीचा तुटवडा, मार्गदर्शनाची कमतरता व जोखीमबद्दलची भीती हे प्रमुख अडथळे आहेत. कौशल्य-आधारित प्रशिक्षण, उद्योगप्रायोगिक कार्यशाळा व समुपदेशन वाढवल्यास व्यवसाय सुरू करण्याची प्रवृत्ती वाढते. स्थानिक औद्योगिक केंद्रे व कृषी-आधारित उपक्रम विद्यार्थ्यांना प्रयोग करण्यास प्रोत्साहन देतात.महाविद्यालये स्थानिक उद्योग, बँका व स्वयंरोजगार संचालनांशी भागीदारी प्रस्थापित करावीत, उद्योजकता अभ्यासक्रमात व्यवहारिक घटक वाढवावा, व स्टार्टअप प्रेरक अनुदान आणावे.धोरणांमध्ये लवकर उपाय केल्यास स्थानिक रोजगारनिर्मिती व नवउद्योग वाढीस मदत होईल, युवकांचे सक्षमीकरण घडेल. ह्या दृष्टीने तातडीने कारवाई आवश्यक आहे.*

## प्रस्तावना:

आजच्या जागतिक स्पर्धात्मक युगात उद्योजकतेचे महत्त्व अधिकाधिक अधोरेखित होत आहे. पारंपरिक नोकरीच्या संधी कमी होत चाललेल्या पार्श्वभूमीवर स्वयंरोजगार आणि उद्योग उभारणी ही काळाची गरज बनली आहे. विशेषतः महाविद्यालयीन तरुणांमध्ये नव्या कल्पनाशक्तीला, जोखमीचे भान ठेवून प्रगती करण्याच्या मानसिकतेला मोठे व्यासपीठ उपलब्ध होत आहे.

नाशिक जिल्हा हा औद्योगिक, कृषी व शैक्षणिकदृष्ट्या विकसित मानला जातो. येथे द्राक्षोद्यान, वाईनरी, द्राक्ष निर्यात, औषधनिर्माण, वाहन उद्योग, शैक्षणिक संस्था अशा अनेक क्षेत्रांत विकास झाला आहे. त्यामुळे महाविद्यालयीन तरुणांसाठी उद्योजकतेच्या अनेक संधी येथे उपलब्ध आहेत. या लेखात नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुणांचा उद्योजकतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यातील अडथळे, संधी आणि अपेक्षित धोरणांचा आढावा घेण्यात येतो.

**संशोधन उद्दिष्टे:**

१. नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुणांचा उद्योजकतेकडे पाहण्याचा दृष्टीकोन समजून घेणे.
२. उद्योजकतेसाठी प्रेरक घटक आणि अडथळे ओळखणे.
३. शैक्षणिक संस्था, सरकार व उद्योगजगत यांची भूमिका स्पष्ट करणे.
४. भविष्यातील धोरणात्मक सूचना मांडणे.

**संशोधन पद्धती:**

या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम माहिती संकलित करण्यात आली.

- **प्राथमिक माहिती** : नाशिक शहर व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसोबत चर्चा करून व निरीक्षणाद्वारे संकलित करण्यात आली आहे.
- **दुय्यम माहिती** : जिल्हा आर्थिक सर्वेक्षण अहवाल, शासकीय कागदपत्रे, पुस्तके, संशोधन लेख, वर्तमानपत्रे यांचा आधार घेतला.

माहितीचे संकलन व विश्लेषण करून विद्यार्थ्यांच्या विचारांची मांडणी केली आहे.

**उद्योजकतेबद्दल तरुणांचा दृष्टीकोन:**

**१. उद्योजकतेची सकारात्मक दृष्टी:** अधिकाधिक विद्यार्थ्यांनी उद्योजकतेला आकर्षक पर्याय मानला व व्यवसाय करण्याचे स्वप्न उरी बाळगत असल्याचे समजते.नवनवीन कल्पना प्रत्यक्षात आणण्याची संधी, स्वतःचे स्वप्न साकार करण्याची क्षमता, आर्थिक स्वावलंबन हे प्रमुख कारणे होती.“नोकरी मागणारा न राहता नोकरी देणारा बनण्याची इच्छा” हा दृष्टीकोन मोठ्या प्रमाणावर आढळला.

**२. नकारात्मकता व भीती:** थोड्या फार प्रमाणात विद्यार्थ्यांना उद्योजकतेत जोखीम जास्त वाटते.भांडवलाचा अभाव, अपयशाची भीती, बाजारपेठेतील स्पर्धा, कौटुंबिक दडपण हे मुख्य अडथळे नमूद झाले.विशेषतः ग्रामीण पार्श्वभूमीतील विद्यार्थी स्थिर नोकरीकडे अधिक झुकलेले दिसले.

**३. उद्योजकतेसाठी प्रेरक घटक:** खालील घटकामुळे विद्यार्थ्यांना उद्योजकतेकरिता प्रेरणा मिळते.

- स्थानिक संसाधने : कृषीउत्पन्न, फळ प्रक्रिया, वाईनरी, पर्यटन क्षेत्र.
- शैक्षणिक संस्था : महाविद्यालयांत उद्योजकता विकास प्रकोष्ठ (EDC), स्टार्टअप सेल.
- सरकारी योजना : मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया, प्रधानमंत्री रोजगार योजना.
- आदर्श व्यक्ती : नाशिकमधील यशस्वी उद्योजक (वाईनरी मालक, लघुउद्योग उद्योजक).

**४. उद्योजकतेतील अडथळे:** पुढील घटकामुळे तरुणवर्ग उद्योजकतेपासून परावृत्त होत असल्याचे जाणवते.पुरेसे भांडवल व कर्ज सुविधा मिळण्यात अडचणी,योग्य मार्गदर्शन व मेंटरशिपची कमतरता.बाजारपेठ व तंत्रज्ञानाची मर्यादित माहिती,जोखीम उचलण्याची

मानसिकता कमी.उद्योजकतेबाबत कौटुंबिक प्रोत्साहनाचा अभाव इत्यादि.

**नाशिक जिल्ह्याच्या संदर्भातील उद्योजकतेच्या संधी:**

पुढील कारणामुळे नाशिक जिल्हा हा उद्योजकतेसाठी सुपीक भूमी ठरतो.

- **कृषी व प्रक्रिया उद्योग** : द्राक्षे, कांदे, टोमॅटो प्रक्रिया, फळे-भाजीपाला निर्यात.
- **वाईनरी उद्योग** : सुला, यॉर्क इत्यादी वाईनरींसारख्या कंपन्यांच्या उपस्थितीमुळे रोजगार व उद्योजकतेच्या संधी.
- **औद्योगिक वसाहती** : अंबड, सातपूर येथील MIDC क्षेत्र.
- **शैक्षणिक केंद्रे** : अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कृषी महाविद्यालये – स्टार्टअपसाठी सक्षम मानवी संसाधन.
- **पर्यटन** : त्र्यंबकेश्वर, अंजननेरी, पंचवटी यांमुळे धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन.

**शैक्षणिक संस्थांची भूमिका:**

१. महाविद्यालयीन तरुणांना उद्योजकतेकडे आकर्षित करण्यासाठी शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

२. अभ्यासक्रमात व्यवहारिक प्रशिक्षण, प्रोजेक्ट वर्क, केस स्टडी यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

३. उद्योजकता विकास प्रकोष्ठ (EDC) द्वारे कार्यशाळा, उद्योजक मेळावे मोठ्याप्रमाणावर आयोजित केले पाहिजे.

४. स्थानिक उद्योगांशी संवाद व सहकार्य वाढवण्यावर भर देणे गरजेचे आहे.

५. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना इंटर्नशिप व लाईव्ह प्रोजेक्टच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभव देण्यावर भर दिला पाहिजे.

६. प्रत्येक महाविद्यालयांतून स्टार्टअप स्पर्धा व इनक्युबेशन सेंटर सुरू करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**सरकार व धोरणकर्त्यांची भूमिका:**

शासनाने उद्योजकेसाठी देण्यात येणारे कर्ज वितरण सुलभ करणे, तरुण उद्योजकांना अनुदान व व्याजमुक्त कर्ज उपलब्ध करून देणे. स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया या उपक्रमांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करणे.ग्रामीण भागात उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे सुरू करणे.स्थानिक उद्योगांना विद्यार्थ्यांना मेंटॉरशिप देण्यास प्रोत्साहन.

**सारांश :**

नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुण उद्योजकतेबाबत आशावादी दृष्टिकोन बाळगतात. परंतु प्रत्यक्ष कृतीत त्यांची टक्केवारी कमी आहे. हे अंतर कमी करण्यासाठी प्रशिक्षण, आर्थिक मदत, मार्गदर्शन व मानसिकतेत बदल आवश्यक आहेत.तरुणांमध्ये जोखीम उचलण्याची क्षमता व आत्मविश्वास निर्माण करणे हे महत्त्वाचे आहे.पालक व समाजाने नोकरीच्या स्थिर मानसिकतेऐवजी उद्योजकतेला मान्यता दिली पाहिजे.उद्योग-शैक्षणिक संस्था-सरकार यांचा समन्वय घडल्यास तरुणांना उद्योजकतेसाठी सक्षम वातावरण निर्माण होईल.

**निष्कर्ष :**

महाविद्यालयीन तरुणांचा उद्योजकतेकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असला तरी त्यात

भीती व अडथळ्यांचे अस्तित्व नाकारता येत नाही. नाशिक जिल्ह्याच्या औद्योगिक व कृषी संपन्नतेमुळे येथे उद्योजकतेसाठी अपार संधी आहेत.

योग्य मार्गदर्शन, भांडवल, प्रशिक्षण व सामाजिक मानसिकतेतील बदल या माध्यमातून तरुण उद्योजकांची संख्या वाढेल. हे केवळ व्यक्तिगत प्रगतीसाठीच नव्हे तर नाशिक जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठीही महत्त्वाचे ठरेल.

**शिफारसी:**

१. महाविद्यालयांत इनक्युबेशन सेंटर व उद्योजकता विकास अभ्यासक्रम सुरू करावेत.
२. जिल्हा स्तरावर स्टार्टअप स्पर्धा व निधी स्पर्धा आयोजित कराव्यात.
३. बँका व सहकारी संस्था विद्यार्थ्यांना सुलभ कर्ज द्याव्यात.
४. यशस्वी उद्योजकांचे अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावेत.
५. ग्रामीण भागातील तरुणांना डिजिटल मार्केटिंग व आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण द्यावे.

**संदर्भ सूची:**

१. Deshpande, R. (2019). उद्योजकता शिक्षण आणि विद्यार्थी. पुणे: विद्या प्रकाशन.
२. Nashik District Statistical Office (2022). District Economic Profile. नाशिक.
३. Ministry of Skill Development and Entrepreneurship (2018). Skill India Initiatives. Government of India.
४. Patil, S. (2021). “Youth Entrepreneurship in Maharashtra – A Case Study of Nashik.” Journal of Commerce and Management Research, Vol. 8(2).
५. National Sample Survey Office (2020). Employment and Unemployment Survey Report.